INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

महिला उदयोजिकता, आर्थिक सक्षमीकरणाचा मार्ग

डॉ. क्षमा चव्हाण
विभाग प्रमुख गृह–अर्थशास्त्र विभाग महिला महाविद्यालय, नागपूर
मेल – kshamadchavahan@gmail.com Cell No - ९४२३६८०२६१

प्रस्तावना –

एक स्त्री स्वत:मध्ये परीपूर्ण आहे. स्त्रीमध्ये सृजनशिलता, पोषण, व परीवर्तनाची क्षमता आहे. भारतीय संस्कृतीत स्त्री शक्तीला अनंत काळापासून मानलेले आहे. प्राचीन काळापासून देवीची विभिन्न स्वरूपात पूजा केली जात आहे. भारतात दुर्गा, काली, केंरळमध्ये महिषुरमर्दीनी व भगवती यांना शक्तीचे प्रतिक मानले गेले असे म्हटले जाते की त्या कार्याला पूर्ण करण्यासाठी स्त्री सक्षम आहे. जे पुरूष करू शकत नाही तीला फक्त प्रोत्साहन देण्याची व संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे.
मागील पाच वर्षात भारतातील लोकसंख्येच्या तुलनेत विविध क्षेत्रात संधीसुद्धा निर्माण झालेली आहे. जवळ जवळ ५० :आहे. आणि त्याच कुटुंबाचा आधार आहे.

उदयोजकता आणि स्वयंसाहायता गट (भ्ळ) माध्यमातून भारतासोबतच सर्व विकासशिल देशात मध्ये गरीब महिलांच्या सक्षमीकरणाचे एक साधन आहे.(अंजली २०१७)

महिला उदयोजकता आणि वित्तीय (आर्थिक) सशक्तीकरणमुळे प्रोत्साहित करण्यात महत्वाची भूमिका बजावतात. भारताच्या काही राज्यामध्ये ग्रामीण महिलासाठी एस.एच.जी.ची संकल्पना वरदान ठरलेली आहे. याचा माध्यमाने त्यांच्या उत्पनात वाढ झाली आहे. आजर विश्वस्तरावर महिला सक्षमीकरण आणि लैंगीक समानता याला मान्यता मिळत आहे. जो सर्व क्षेतात प्रगती करण्याचे व सफलता प्राप्त करण्याचे एक माध्यम आहे. (संजय कांती दास २०१२)

सुक्ष्म उदयोजकता महिला सक्षमीकरणाला मजबूत करित आहे. आणि लैंगीक असमानतेला दुर करीत आहे एस एच जी चे लघु ॠण तंत्र, सदस्यांना इतर सामुदायीक विकास कार्यक्रमात समाविष्ठ आहे. लघू ॠुण अगदी लहान प्रमाणात व्यवसाय किंवा उदयोगाला प्रोत्साहीत केले जात आहे. आणि याचा मुख्य उद्देश आर्थिक उत्पन्न प्राप्त करण्याच्या कार्याबरोबर गरीबी कमी करणे होय.

भारत सरकार पुढाकार –

महिलांची उदयमशिलता आणि आर्थिक भागीदारी चे महत्वाचा स्विकार करीत देशाचा विकास आणि समृद्धी विचार करून भारत सरकारने हे सुनिश्चित केले आहे की सर्व नीतीगत कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना समान संधी देण्याचा प्रयत्न केला जाईल. सरकारी कर्ज, नेटवर्क, बाजारपेठ प्रशिक्षणापर्यंत महिलांना संधी देवून त्यांना भारताच्या अर्थव्यवस्थेच्या पहिल्या रांगेत आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

उदयोजकता आणि नवीनतेला प्रोत्साहीत करण्यासाठी खालील काही प्रयत्न केले जात आहे.

स्टार्ट अप इंडीया–

स्टार्ट अप इंडीया अंतर्गत भारसरकार स्टार्ट अप्सला प्रोत्साहीत आणि पोबीत करीता उदयोजकतेला प्रोत्साहीत करित आहे याची सुरवात जानेवारी २०१६ मध्ये केली गेली तेव्हा पासूनच या माध्यमाद्वारे अनेक नवीन विकसीत उदयोजकांनी आपली सफल सुरूवात केली आहे. हा कार्यक्रम एका संपूर्ण दृष्टीकोनातून ४ आठवडयात मोफत आणि व्यापक ऑनलाईन शिक्षण कार्यक्रम दिला जात आहे. या अंतर्गत शैक्षणिक आणि उदयोगसंघात एक मजबूत नेटवर्क तयार केले गेले आहे. सोबतच संपूर्ण देशात रिसर्च पार्क,इन्क्युबेटर्स आणि स्टार्ट अप सेंटर स्थापीत केले गेले आहे.

महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमासाठी प्रोत्साहन (स्टेप) विशेषकरून ग्रामीण भागातील ज्या महिलांना औपचारीक दक्षता प्रशिक्षण सुविधा प्राप्त नाही त्यांना प्रशिक्षीत करण्यासाठी महिला व बालविकास मंत्रालयाने स्टेप कार्यक्रमाची सुरवात केली आहे. दक्षता विकास उदयोजकता मंत्रालय आणि नीती आयोगाने नुकताच वास्तविक गरजांना लक्षात ठेवत ३० वर्षीय दिशानिर्देशांचा पुन्हा मसुदा तयार केला आहे. १६ वर्षापेक्षा अधीक वयाच्या सर्व भारतीय महिला या प्रकल्पाद्वारे लाभान्वीत होतील हा कार्यक्रम कृषी, बागायती, खादय प्रसंस्करण, हॅडल्यूम, पारंपारीक कला जसे कशीदाकारी, यात्रा व पर्यटन, कंप्युटर व आईटी सेवा अशा अनेक क्षेत्रात सुरू करण्यात येत आहे.

स्डॅड अप इंडीया –

२०१५ मध्ये या कार्यक्रमाची सुरवात झाली याचा मुख्य उद्देश भारतातील वंचीत समुहाला कर्ज देणे किंवा मंजूर करणे व सोबतच महिला उदयोजिका, अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती मधील आर्थिक वाटा वाढविणे आणि त्यांच्या पर्यंत भारताचे विकासाचे लाभ पोहोचविणे या अंतर्गत १ महिला आणि एक अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमाजितील एका सदस्याला मॅन्युफॅक्चरींग, सेवा किंवा व्यापार क्षेत्रात ग्रीनफिल्ड उदयोग करण्यासाठी १० लाखापासून तर १ कोटी रूप्यापर्यंत कर्ज दिले जाते. स्टॅड अप इंडीया पोर्टल लहान उदयोजकांसाठी एक डिजीटल मंच च्या स्वरूपात कार्य करित आहे. तसेच वित, पोषण आणि ॠण गॅरंटी ची सुचना प्रदान करतात.

व्यापारसंबधी– उदयजिता साहयता आणि विकास –

(ट्रीड) – भारतातील वंचीत महिला गटाला ॠण देण्याकरिता ट्रीड कार्यक्रमाची सुरवात केली गेली हा कार्यक्रम गैर सरकारी संस्था किंवा संघटनेच्या (एन जी. ओ) च्या माध्यमातून इच्छूक महिलांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आहे. महिला पंजीकुत (रजरस्टर्ड) गैरसरकारी संघटनेच्या साहय्याने कर्ज प्राप्त करू शकते आणि

प्रस्तावीत उदयोगासाठी सल्ला घेण्यासाठी व प्रशिक्षण सुद्धा घेवू शकते. ज्यामुळे त्यांना गैरकृषी कार्यासाठी मार्गदर्शन मिळेल.

महिला उदयजिता मंच –

(डब्ल्यूईपी) नीती आयोगाने महिला उदयाजिता मंचाची सुरवात केली आहे. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश भारतातील महिला उदयोजिकांकरिता एक अयाी व्यवस्था तयार करणे आहे. ज्यामुळे उदयमशिलतेची आपली संभवना अनभवू शकेल बरोबरीने मदत करू शकेल व आपल्या व्यवसायाला स्थायीत्व आणि दिर्घकालीन रणनितीचे आकलन करू शकेल या मंचाला महिला उदयोजींकांची संख्या वाढावी अशी अपेक्षा आहे. जो एक गतीशील नवीन भारताचे सृजन करून शशक्त करू शकेल हया तीन घटना प्रदर्शीत करते ज्यावर डब्ल्युईपी आधारीत आहे.

1. इच्छाशक्ती (ज्यात नवीन उदयोजकांना उदयोग सुरू करण्यासाठी प्रोत्साहीत करणे.
2. ज्ञान शक्ती –(महिला उदयोजिकांची उत्तम शिकलेला पोषीत करण्यासाठी ज्ञान आणि इकोसीस्टीमचे सहकार्य करणे) आणि
3. कर्मशक्ती – (उदयोजकांना सक्रीय सहयोग प्रदान करणे ज्यामुळे ते स्वत:चा व्यवसाय स्थापीत करू शकतील

महिलांसाठी मुद्रा योजना –

सरकारद्वारे सुरू झालेली मुद्रा योजना त्या महिलांना व्यक्तीगत स्तरावर मदत देते जे छोटे व्यवसाय जसे ,ब्युटीपार्लर, टेलरींग , टयुशन सेंटर इत्यादी व्यवसाय करण्याची इच्छा व्यक्त करते ही योजना महिलांच्या समुहालाही मदत करते या कर्जासाठी कोणत्याच प्रकारची जमानत रक्कम आवश्यक नाही. याच्या अंतर्गत तिन योजनांचा लाभ घेता येतो.

1. शिशु – या कर्जाची रक्कम ५०,००० रू. पर्यंत सीमीत आहे. सुरवातीला व्यवस्थायीकाद्वारे लाभ घेतला जातो.
2. किशोर – या अंतर्गत कर्जाची रककम ५०,००० –५ लाख रूप्यापर्यंत असते. याचा लाभ तेच उददोजक घेवू शशकतात ज्यांचा व्यवसाय पूर्ण पणे स्थापीत आहे.
3. तरूण – याची कर्जाची रककम १० लाख रू आहे. त्या व्यवसायाद्वारे याचा लाभ घेता येवू शकते ज्याचा व्यवसाय अगदी चांगल्या प्रकारे स्थापीत झालेला आहे. परंतू त्याच्या विस्तारासाठी धनराशी आवश्यक असते.

निष्कर्ष –

महिला उदयोकतांना देशातील आर्थिक विकासातील एक महत्वपूर्ण स्त्रोत मानल्या गेले आहे. कारण ती स्वत: सोबतच दुसऱ्यांना रोजराग मिळवून देण्याची क्षमता ठेवते सोबतच योग्य व्यवस्थापन, योग्य संघटना आणि व्यवसाय किंवा उदयोगाशी संबंधीत उदभवलेल्या समस्यांसाठी समाजाला समाधान सुद्धा देवू शकते परंतू तरीही भारतीय उददयोग क्षेत्राात त्यांना खूप जास्त प्रमाणात प्रतिनिधित्व मिळत नाही.

महिलांची उदयमशिलता कुटुंब आणि समुदायाचे आर्थिक कल्याण, गरीबीचे योगदान देवू शकते. याप्रमाणे ती सतत विकासाच्या उददीष्टांना प्राप्त करण्यासाठी महत्व पूर्ण भूमिका वठवित असते. यामुळेच विश्वतील सरकारी आणि विविध विकास संघटना आपल्या योजनाना प्रोत्साहन पूरक उपायांच्या माध्यमातून महिला उदयोकांना प्रोत्साहीत करण्यासाठी सक्रीय स्वरूपात कार्य करीत आहे.

संदर्भसुची –

- अंजली शर्मा, बिकाशरॉय, दिपा चक्रवती (२०१७) पोटॅशियल आफॅ सेल्स हेल्थ गृपस् अ– केस स्टडी फॉर्म उत्तर दिनाजपूर डिस्ट्रीक्ट ऑफ वेस्ट बेंगाल
- संजय क्रांती दास (२०१२) इंटरप्रीनीअल ॲक्टीव्हीटीज ऑफ सेल्फ हेल्थ गृपस: टुवर्टस् विमेन एंपॉवरमेंट : अकेस स्टडी टु हिल डिस्ट्रीक्टस ईन आसाम
  ज्रनल ऑफ इंटरप्रीन्योरशिप मफनेजमेंट खंड १ अंक २ जून २०१२
- योजना – महिला श्शशक्तीकरण – ऑक्टो. २०१८
- उदयोजक ऑक्टो. २०१८
- डॉ जयंत जोशी उदयोजकता २००१
  पिंपळापूरे पब्लीकेशन नागपूर
  सुधीर सेवेकर – उदयोजक्ता संकल्पना आणि प्रेरणा – पिंपळापूरे पब्लीकेशन नागपूर
- कुरूक्षेत्र – सुक्ष्म लघू और मध्यम उदयोग ऑक्टो. २०१८

❖❖❖❖